| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १७/०१/२०२६ |
| नोंदणी दिनांक | : | १७/०१/२०२६ |
| निकाल दिनांक | : | १२/०३/२०२६ |
| निकाल कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०० ०१ २५ |

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कोर्ट क्रमांक–२ पुसद यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी–श्रीमती व्ही.डी.बिरहारी)**

**दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक–१७/२०२६** ***निशाणी क्रमांक–१***

१. **श्रीमती अलका गुणवंत राठोड,**
वय– ५० वर्षे, व्यवसाय–घरकाम

२. **सौरव गुणवंत राठोड,**
वय– २८ वर्षे, व्यवसाय–शिक्षण

३. **कु.प्राजक्ता गुणवंत राठोड,**
वय– २९ वर्षे, व्यवसाय–शिक्षण
सर्व रा.मोहा ईजारा, पुसद, ता.पुसद जि.यवतमाळ.

**विरुद्ध**

कोणीही नाही. ***सामनेवाला...***

**अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी.**

**१.** मुंबई विनिमयाचे धारा ८ सन १८२७ चे नियम २ च्या तरतुदीनुसार अर्जदार क्रमांक–१ ते ३ यांनी कै.गुणवंत सुका राठोड यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**अर्जदारांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे** :–

२. अर्जदारांनी सदरील अर्ज 'वारस प्रमाणपत्र' मिळणेकामी दाखल केला आहे. अर्जदार वरील नमूद ठिकाणचे कायमस्वरुपी रहिवाशी आहेत. अर्जदार क्रमांक–१ ही त्यांची पत्नी व अर्जदार क्रमांक–२ व ३ हे मयत कै.गुणवंत सुका राठोड यांची मुले आहेत. कै.गुणवंत सुका राठोड हे दिनांक ०९.०३.२०१५ रोजी मयत झाले आहेत.

३. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, कै.गुणवंत सुका राठोड हे यवतमाळ येथे असताना उपचारादरम्यान मयत झालेले असल्याने व अर्जदार क्रमांक–१ ही त्यांची पत्नी व अर्जदार क्रमांक–२ व ३ हे त्यांची मुले असल्याने कै.गुणवंत सुका राठोड यांच्या मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्याकरिता अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता व इतर शासकीय कामाकरीता त्यांना वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे.

४. तदनंतर, प्रस्तुत अर्जात अर्जदार यांनी 'विदर्भ मतदार' या वृत्तपत्रात दिनांक ०३/०२/२०२६ रोजी जाहीर प्रगटन दिले. जाहीर प्रगटन देवून देखील प्रस्तुत प्रकरणात हजर राहून अर्जास कुणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदारांच्या कथनांचा विचार करता खालील प्रश्न माझे विचारार्थ निघाले असून, त्या प्रश्नांवरील उत्तरे कारणांसहित खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्रमांक–१ ते ३ हे मयत कै.गुणवंत सुका राठोड यांचे कायदेशीर वारस आहेत काय? | **होय.** |

| | | |
|---|---|---|
| २. | अर्जदार क्रमांक–१ ते ३ हे वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र आहेत काय? | **होय.** |
| ३. | आदेश काय? | **अंतिम आदेशानुसार.** |

**–: कारणमिमांसा :–**

**प्रश्न क्रमांक १ व २ करिता**

५. अर्जदार क्रमांक–१ यांनी त्यांच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र ***निशाणी क्रमांक–८*** वर दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक–१ ने मयत पती नामे कै.गुणवंत सुका राठोड यांच्या मृत्यु प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रत ***निशाणी क्रमांक–९*** वर दाखल केली आहे. तसेच, अर्जदारांनी अर्जदार क्रमांक–१ ते ३ यांच्या आधार कार्डची व्हेरीफाईड प्रत ***(निशाणी क्रमांक–१० ते १२)*** *वर* तसेच अर्जदारांनी दिनांक ०३.०२.२०२६ रोजी दैनिक 'विदर्भ मतदार' या वृत्तपत्रात प्रकाशित केलेल्या जाहिरनाम्याची प्रत ***निशाणी क्रमांक–१३*** वर दाखल केलेली आहे व सदर वृत्तपत्रात जाहीरात देय दिल्याबाबतची पावती त्यांनी दाखल केलेली आहे. त्यास ***निशाणी क्रमांक–१४*** देण्यात येत आहे. सर्व साक्षीदारांच्या साक्षीमधून व अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे व पुराव्याचे अवलोकन केले असता, अर्जदार क्रमांक–१ ते ३ हे कै.गुणवंत सुका राठोड यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत पुष्टी मिळते.

६. अर्जदार यांनी दैनिक 'विदर्भ मतदार' पुसद या वृत्तपत्रात दिनांक ०३/०२/२०२६ रोजी जाहीर प्रगटन दिले. जाहीर प्रगटन देवून देखील प्रस्तुत

प्रकरणात हजर राहून अर्जास कुणीही हरकत घेतलेली नाही. तसेच, प्रस्तुत प्रकरणात कुणीही हजर न राहिल्याने अर्जदार यांची साक्ष अबाधित राहिली. त्यामुळे ***अर्जदार क्रमांक–१ ते ३*** हे मयत कै.गुणवंत सुका राठोड यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. ***अर्जदार क्रमांक–१ ते ३*** यांनी सदरचे वारसप्रमाणपत्र त्यांच्या स्वतःच्या नावे मिळण्यास विनंती केली आहे. त्यामुळे ***प्रश्न क्रमांक–१ व २*** चे उत्तर मी होकारार्थी देऊन, खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित केरीत आहे.

| –: आ दे श :– | |
|---|---|
| १. | अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | या आदेशाद्वारे असे जाहीर करण्यात येते की, ***अर्जदार क्रमांक–१ ते ३*** हे ***कै.गुणवंत सुका राठोड*** यांचे कायदेशीर वारस आहेत व त्यानुसार अर्जदार क्रमांक–१ ते ३ यांच्या नावे कायद्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र योग्य ते मुद्रांक शुल्क आकारुन देण्यात यावे. |
| ३. | खर्चाबाबत आदेश नाही. |

**Sd/–**

**(श्रीमती व्ही. डी. बिरहारी)**
दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,पुसद,
ता.पुसद, जि.यवतमाळ.(कोर्ट नं.२)

दिनांक १२/०३/२०२६